प्रेसनोट दि. १०/०९/२०१८

## 'ओएलएक्स' वरुन आयफोन विकण्याचे अमीष दाखवुन फसवणुक करण्या-या आरोपींना राजस्थान येथुन सायबर क्राईम सेल, पुणे शहर यांनी केली अटक

पुणे शहरातील संत तुकारमनगर हिंजवडी या भागात राहणा-या तक्रारदार यांनी ओएलएक्स वर आयफोन-६ हा विक्रीसाठी असल्याची जाहीरात पाहुन जाहीरातीमधील मोबाईल तक्रारदार यांना आवडल्याने त्यांनी सदर वेबसाईटवर संपर्कासाठी असलेल्या मोबाईलवर संपर्क केला असता समोरील व्यक्तीने व्हॉट्सअपचा नंबर देवुन त्यावरुन आपण भारतीय सैन्यदलातील जवान असल्याचे खोटे सांगुन आधारकार्ड व कँटीन कार्ड तक्रारदार यांना पाठविले ते तक्रारदार यांना खरे वाटल्याने सदर मोबाईलचा १४,०००/- रुपयांना ठरला. त्यामध्ये प्रथम ५० टक्के रक्कम व उरलेली ५० टक्के रक्कम मोबाईल मिळाल्यानंतर देण्याचे ठरले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी विश्वासाने आरोपी याने पाठविलेल्या पेटीएम अकाऊंटवर नंबर- ८७४२८६१०४१ यावर ५० टकके रक्कम म्हणजे ७,०००/- रुपये पाठविले. त्यानंतरही आरोपी याने तक्रारदार यांना मोबाईल पाठविला नाही त्यामुळे तक्रारदार यांनी त्याचेशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता प्रथम उडवाउडवीची उत्तरे देवुन मोबाईल बंद केला व तक्रारदार यांची रक्कम परत दिली नाही. तेव्हा तक्रारदार यांची फसवणुक झाल्याचे लक्षात आल्याने त्यांनी प्रथम सायबर सेल येथे तक्रार अर्ज दिला व त्यावरुन हिंजवडी पोलीस स्टेशन पुणे गुन्हा रजि. नं. ३९९/२०१८ भादंवि कलम ४१९,४२० आयटी ॲक्ट कलम ६६ सी, ६६ डी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अशाच प्रकारे विमानतळ हद्दीत राहणाऱ्या इसमास ओलएक्स वर जुना आयफोन मोबाईल विक्रीसाठी असल्याची जाहीतरात पाहुन त्यावरुन संपर्कासाठी असलेल्या मोबाईलवर फोन केला असता समोरील व्यक्तीने व्हॉट्सअपवरुन आपण भारतीय सैन्यदलात असल्याचे खोटे सांगुन स्वत:चे आधार कार्ड व कॅन्टीनचे कार्ड तक्रारदार यांना पाठविले. त्यावर तक्रारदार यांचा विश्वास बसल्याने त्यांचेमध्ये सदर आयफोन -६ मोबाईलचा व्यवहार १६,०००/- रुपयांत ठरला व सदर रक्कम भरल्यानंतर मोबाईल देण्याचे ठरले. त्याप्रमाणे तक्रारदार यांना समोरील व्यक्तीने सैन्य दलात असल्याचे सांगितले असल्याने त्यावर विश्वास ठेवुन त्याने सांगितलेल्या पेटीएम नंबर ९६४९७१०४७१ वर ठरल्याप्रमाणे १६,०००/- रुपये पाठविले. परंतु तक्रारदार यांना समोरील व्यक्तीने ठरल्याप्रमाणे मोबाईल पाठविला नाही. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांचेशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्याने प्रथम उडवाउडवीची उत्तरे देवुन नंतर मोबाईल बंद केला. तेव्हा तक्रारदार यांची फसवणुक झाल्याचे लक्षात आल्याने त्यांनी प्रथम प्रथम सायबर सेल येथे तक्रार अर्ज दिला व त्यावरुन विमानतळ पोलीस स्टेशन पुणे गुन्हा रजि. नं. २४१/२०१८ भादंवि कलम ४१९,४२० आयटी ॲक्ट कलम ६६ सी, ६६ डी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वर नमुद गुन्ह्याचा सायबर सेलकडून समांतर तपास करित असताना, दोन्ही गुन्हयातील आरोपी यांची मोडस ही एकच असल्याने तसेच तपासादरम्यान आरोपींचे मोबाईल क्रमांकाचे विश्लेषणावरुन व इतर तांत्रिक माहितीचे आधारे यातील आरोपी हे राजस्थान येथील असल्याचे प्रथम दर्शनी निष्पन्न झाल्याने सदर आरोपींचा शोध घेणेकामी सायबर विभागाकडील १ पोनि, १ पोउपनि व पथक राजस्थान येथे रवाना झाले. त्याप्रमाणे हिंजवडी पोलीस स्टेशन पुणे गुन्हा रजि. नं. ३९९/२०१८ मधील आरोपी - अल्पवयीन मुलास त्याचे राहते घरातुन ताब्यात घेवुन त्याचेकडुन त्याने गुन्हा करण्यासाठी वापरलेले दोन मोबाईल संच हस्तगत करण्यात आले आहेत. सदर अल्पवयीन मुलास बाल न्यायालय यांचे समक्ष हजर करुन त्याची बाल सुधारगृहात रवानगी करण्यात आली आहे.

तसेच विमानतळ पोलीस स्टेशन पुणे गुन्हा रजि. नं. २४१/२०१८ मधील आरोपी येथील राजस्थान येथे जाऊन शोध घेतला असता १) तौफिक दिनु खान वय २२ वर्षे रा. देसुला खोड, ता. जि. अलवार राज्य राजस्थान व एक अल्पवयीन मुलगा करीत असल्याचे निष्पन्न झाले त्यांचे ताब्यातुन गुन्हा करण्यासाठी वापरलेले ४ मोबाईल संच, १ बँक पासबुक, १ डेबिट कार्ड असा मुद्देमाल मिळुन आला. आरोपी क्रं.१ यास अटक करण्यात आली असुन अल्पवयीन मुलास बाल न्यायमंडळ यांचे समक्ष हजर करुन त्यांची सुधारगृहात रवानगी करण्यात आली आहे. आरोपी क्रं. १ यास विमानतळ पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास विमानतळ पोलीस करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त डॉ. के व्यंकटेशम्, मा. पोलीस सह ऑयुक्त श्री. बोडखे, मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे ज्योतीप्रिया सिंह व मा. सहा. पोलीस आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे श्री. मोरे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राधिका फडके, पोलीस उप निरीक्षक किरण औटी, व कर्मचारी राजकुमार जाबा, जगनाथ जाधव किरण अब्दागिरे, अनुप पंडीत योगेश वाव्हळ व ज्योती दिवाणे यांचे पथकाने केली आहे.

सर्व नागरिकांना आव्हान करण्यात येते की, अशा प्रकारे ओएलएक्स वरुन व पेटीएम नंबर- ९६४९७१०४७१, ८७४२८६१०४१, मोबाईल नंबर- ९४१४१००९२६, ८०९४२३३४६४ वरुन फसवणुक झाली असल्यास त्यांनी तात्काळ हिंजवडी पोलीस स्टेशन व विमानतळ पोलीस स्टेशन येथे संपर्क करावा. अशा प्रकारच्या कोणत्याही अमीषाला नागरीकांनी बळी पडु नये.